निलंबन आदेश रद्द करणेबाबत.
कु. प्रतिमा दी. वाठोरे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, वडगाव (धा.) (प्रा.), यवतमाळ वनविभाग

# महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एफएसटी-०४/२६/प्र.क्र.८०/वने-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २५ मे,२०२६.

संदर्भ :- १. प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर यांचा निलंबन आदेश क्र.कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.१७४/२५-२६/०३, दि.०१.०४.२०२६
२. कु. प्रतिमा दी. वाठोरे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे दि.०७.०४.२०२६ रोजी मा. मंत्री (वने) यांचेकडे दाखल केलेला अपील अर्ज.
३. मा. मंत्री (वने) यांचे दि.०५.०५.२०२६ रोजीचे आदेश.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा., नागपूर यांचे पत्र क्र. प्रमुवसं वबप्र/वस्विस/५०/२०२६-२७, दि.११.०५.२०२६

## शासन आदेश:-

कु. प्रतिमा दी. वाठोरे, तत्का. व.प.अ.वडगाव (धा.) (प्रा.), यवतमाळ वनविभाग यांच्या कार्यक्षेत्रातील राखीव वन असलेल्या गट क्र. २१८ मधील २६७ झाडांची अवैध तोड झाली असल्याचे निदर्शनास आल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ पोटनियम (एक) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून संदर्भाधीन क्र. १ येथील दि.०१.०४.२०२६ रोजीच्या शासन सेवेतून निलंबित केले होते.

कु. वाठोरे, व.प.अ. यांनी संदर्भ क्र.०२ येथील दि.०७.०४.२०२६ च्या अपील अर्जान्वये संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशाविरुध्द मा.मंत्री (वने) यांच्याकडे अपील दाखल करुन निलंबन रद्द करुन पुर्ववत पदावर पदस्थापना देण्याची विनंती केली आहे. कु. प्रतिमा वाठोरे, व.प.अ. यांच्या संदर्भाधीन क्र.२ येथील अपील अर्जावर मा. मंत्री (वने) यांचेसमोर दि.२९.०४.२०२६ रोजी सुनावणी पार पडली. त्यानुषंगाने संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणाची चौकशी तात्काळ पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म. रा., नागपूर यांनी पुढील ७ दिवसाच्या आत शासनास सादर करावा, असे निर्देश दिले.

त्यानुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा., नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये सादर केला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी कु. वाठोरे, व.प.अ. या निर्दोष असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्या विरुध्द केलेली निलंबनाची कार्यवाही चुकीच्या पध्दतीने व असमर्थनीय असल्याने त्यांचे निलंबन खारीज करण्यात येवून त्यांची पुर्वीच्या पदावर पदस्थापना करण्याची शिफारस केली आहे.

कु. प्रतिमा दी. वाठोरे, तत्का. व.प.अ.वडगाव (धा.) (प्रा.), यवतमाळ वनविभाग यांचे संदर्भ क्र.१ येथील आदेशान्वये करण्यात आलेले निलंबन पूर्णत: असमर्थनीय असल्याचे स्पष्ट होत आहे. यास्तव **महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ (५) (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन कु.प्रतिमा दी. वाठोरे, तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, वडगांव (प्रा.), यवतमाळ वनविभाग यांचे संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०१.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेले निलंबन रद्द करण्यात येवून त्यांना "वनपरिक्षेत्र अधिकारी (धा.) (प्रा.), यवतमाळ वन विभाग" या पुर्वीच्या पदावर पुर्ववत करण्यात येत आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

25.5.2026

(निकेता पांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन- दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ.
३) कु. प्रतिमा दी. वाठोरे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, वडगाव (धा.) (प्रा.), यवतमाळ वनविभाग यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर यांच्यामार्फत.
४) निवड नस्ती (वने-४)